# महेश सहकारी बँक लि., पुणे

मुख्य कार्यालय: ३७२/७३/७४, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-४११०३७.
दुरध्वनी: मु.क. (०२०)- २४२६३३४१/४२/४३
Website : www.maheshbankpune.bank.in
Email : msbl@maheshbankpune.bank.in

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

### फक्त सभासदांसाठी

महेश सहकारी बँक लि., पुणे या बँकेची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २०.०९.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता झांबरे पॅलेस, ६९९/अे, झांबरे इस्टेट, मुकुंदनगर, पुणे ४११०३७ येथे खालील विषयांवर कामकाज करण्यासाठी भरणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

### ❊ सभेपुढील विषय ❊

१. मागील वर्षी दिनांक १४.०९.२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

२. संचालक मंडळाचा बँकेच्या कार्याबद्दलचा वर्षअखेरचा अहवाल व लेखापरिक्षण झालेल्या दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या वर्षाचे नफातोटा पत्रक व ताळेबंद स्वीकृत करणे.

३. सन २०२५-२६ साठीच्या मा. संचालक मंडळाने कायदा, नियम व उपविधी यास अनुसरून केलेली नफा वाटणी स्वीकृत करणे

४. सन २०२६-२७ करीता संचालक मंडळाने तयार केलेले अंदाजपत्रक आणि प्रगतीचा तक्ता स्वीकृत करणे.

५. सन २०२५-२६ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व सन २०२४-२५ चे वैधानिक लेखापरिक्षण दोषदुरूस्ती अहवालाची नोंद घेऊन स्वीकृत करणे.

६. सन २०२५-२६ या सालासाठी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मा. वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती व मानधन ठरविणे याबाबतचे निर्णयानुसार मा. संचालक मंडळाने केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे.

७. आर्थिक वर्ष सन २०२६-२७ करिता वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीबाबत, रिझर्व्ह बँकेने केलेल्या निर्देशास अधिन राहून संचालक मंडळाने केलेल्या शिफारसीस व द्यावयाचे मानधन यांस मान्यता देणे.

८. दिनांक ३१.०३.२०२६ अखेर संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.

९. महाराष्ट्र शासनाच्या नागरी सहकारी बँकांसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना, शासन निर्णयानुसार दि. ३१.०३.२०२६ पर्यंत तडजोड केलेल्या थकित कर्ज खात्यांच्या माहितीची नोंद घेणे.

१०. सेवकांची रचना व नेमणुकीस मान्यता देणे.

११. अहवाल वर्षात सहकार खात्याने मागविलेल्या माहितीची नोंद घेणे.

१२. सन २०२६-२७ करीता बँकेच्या सभासदांचे शिक्षण व प्रशिक्षणाचे संदर्भात चर्चा करणे.

१३. मा. अध्यक्षांचे पूर्वपरवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे.

**स्थळ : पुणे**
**दिनांक : १३.०८.२०२६**

**मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरून,**
**(एम. एम. गावसाने)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**विशेष सूचना :**

१) गणसंख्ये अभावी (कोरम एकूण सभासद संख्येच्या १/५ किंवा २०० सभासद यापैकी जी सभासद संख्या कमी असेल ती संख्या) सभा तहकूब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी ११.०० वाजता घेण्यांत येईल व अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

२) बँकेचे लेखापरिक्षित नफा-तोटा पत्रक, ताळेबंद व संचालक मंडळाचा अहवाल बँकेचे मुख्यकार्यालय व सर्व शाखा कार्यालयामध्ये उपलब्ध आहे, तो सभासदांनी सदर कार्यालयांतून पोहोच देऊन घ्यावा अथवा आपणांस तो पोस्टाने हवा असल्यास तसे मागणीचे लेखी पत्र मुख्यकचेरीस पाठवावे. त्यानुसार सभासदाचे बँकेत नोंदविलेल्या पत्त्यावर अहवाल पाठविला जाईल.

३) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीस मधील विषयांबाबत अधिक स्पष्टीकरण हवे असल्यास तसे पत्र दिनांक १५/०९/२०२६ पूर्वी बँकेच्या मुख्यकार्यालयाकडे कार्यालयीन कामकाजाचे वेळेत पाठवावे.

### सभासद प्रशिक्षण

**बँकेच्या सभासदांसाठी बँकींग या विषयातील तज्ञ व्याख्याते यांचे वरील सभेपूर्वी सकाळी ९.२० ते १०.२० या वेळेत प्रशिक्षण आयोजित केलेले आहे. तरी सर्व सभासदांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. (उपस्थितांसाठी स. ८.३० ते ९.१५ पर्यंत अल्पोपहाराची व्यवस्था केली आहे.)**